| १. | २. | ३. | ४. | ५. |
|---|---|---|---|---|
| | ५. नागरी सहकारी बँका. — | कॅश क्रेडीट | १४.००% | — |
| | ६. अर्बन कोऑप.संस्था — | कॅश क्रेडीट | १६.००% | — |
| | ७. ग्रामिण कारागीर बलुतेदार संस्था | कंपोझीट कर्ज व कॅश क्रेडीट | | |
| | | अ) रु २५०००/- पर्यंत | ९.००% | १२.५०% |
| | | ब) रु २५०००/- चे वर | ११.५०% | १४.००% |
| १०. | वैयक्तिक कर्जावरील व्याज दर. | | | |
| | १. सुवर्ण तारण कर्ज | अ) सर्वसाधारण | १६.००% | — |
| | | ब) शेतकऱ्यांसाठी (७/१२ चा उतारा घेऊन) | १४.००% | — |
| | २. वैयक्तिक ओव्हर ड्राफ्ट (वैय० बचत ठेव खात्यावरील) | | १६.००% | — |
| | ३. वैयक्तिक ग्राहकोपयोगी कर्ज | | १६.००% | — |
| | ४. वाहन खरेदी (वैयक्तिक (व्यावसायिकांना खाजगी उपयोगाकरिता) | | १६.५०% | — |
| | ५. रोड ट्रान्सपोर्ट (सिडबी/नाबार्ड योजने अंतर्गत) | | १६.००% | — |
| | ६. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे (एन.एस.सी.) | | १६.००% | — |
| | ७. वैयक्तिक व्यवसायासाठी | | | |
| | | अ) वलिन कॅश क्रेडीट | १६.५०% | — |
| | | ब) नजरगहाण कॅश क्रेडीट | १६.५०% | — |

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ११(४) - बँकेचे उपविधी क्रमांक ५७ मध्ये सुधारणा करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ११(४) - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन गटसचिवांना बँकेचे नफ्यातून बक्षिस देण्याकरिता रक्कम उपलब्ध करून देणेसाठी उपविधी मध्ये तरतुद नसल्याने खालील प्रमाणे बँकेचे उपविधी क्रमांक ५७ मध्ये सुधारणा करणेस मान्यता देण्यात आली असून सुधारणा करणेसाठी बँकेचे वार्षिक साधारण सभेची मंजूरी घेण्यात यावी असे ठरले.

| | Byelaw No. | Existing Byelaw | Amendment proposed | After Amendment of Byelaw | Reason for Amendment |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 57(६) | – | (Newly added) To pay Bakshis to the staff of Nagpur District supervision Cooperative society Ltd, Nagpur as recommended by the Board of Directors and sanctioned by the Annual General Meeting. | To pay Bakshis to the staff of Nagpur District spervision Cooperative society Ltd., Nagpur as recommended by the Board of Directors and sanctioned by the Annual General Meeting. | To encourage the group Secretary for effective recovery of the Bank. |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ११(५) – अमृत महोत्सव निधी रु.१५००००/- बचत फंडाला वळता करण्याबाबत निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ११(५) – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेला ७५ वर्षे झाल्याप्रसंगी अमृत महोत्सव साजरा करण्याकरिता अमृत महोत्सव निधी रु.१५००००/- निर्माण करण्यांत आला होता. परंतु त्या वर्षांत मोठ्या प्रमाणांत दुष्काळ आल्याने महोत्सव साजरा झाला नाही. त्यामुळे ताळेबंदात अमृत महोत्सव निधी रु.१५००००/- दिसतो आहे. अंकेक्षण अहवालांतनिधी बचत फंडाला वळती करण्यांबाबत सुचना आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन सद्याच अमृत महोत्सव निधी रु.१५००००/- बचत फंडाला वळती करण्यात येवू नये असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ११(६) – दिर्घ मुदती कर्ज धोरण महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १६२ अन्वये सहकार खात्यामार्फत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस भुविकास बँक म्हणून काम करण्यास कायम स्वरूपी मिळालेल्या परवानगीनुसार सामील बाबी अंतर्गत कार्यवाहीची तरतुद बँकेचे उपविधीमध्ये करणे संदर्भात मंजुरी बाबत.

ठराव क्रमांक ११(६) – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, कृषि आणि ग्रामीण विकास बँक करीत

दिर्घ मुदती कर्ज पुरवठा करण्याची बरिचशी कामे आपली जिल्हा बँक करीत आहे. तथापी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या कलम १११ अंतर्गत करावयाची कामे करण्यांकरिता बँकेचे उपविधीमध्ये दुरुस्ती करावी लागेल. बँकेचे उपविधीमध्ये खालिल प्रमाणे करण्यांत येणाऱ्या दुरुस्तीस मान्यता देण्यांत आली असून, सदर दुरुस्ती बँकेचे वार्षिक साधारण सभेपुढे ठेवण्यांत यावी असे ठरले.

| Byelaw No. | Existing Bye laws | Amendment proposed | After Amendment of the Byelaws | Reason for Amendment |
|---|---|---|---|---|
| 2(xxiii) | To finance long-term loans through Agricultural Cooperative societies. | Add - and to act as Agricultural and Rural Development Bank for financing the purposes narrated under Section 111(2) of Maharashtra Cooperative Societies Act. 1960 - | To finance long term loans through Agricultural Cooperative Societies and to act as Agricultural & Rural Development Bank for financing the purposes narrated under Section 111(2) of Maharashtra Cooperative Societies Act. 1960 | The Commissioner for Cooperation & Registrar of Cooperative Societies, Maharashtra State, Pune granted permission to DCCB vide letter No. Fin-2/D/DCCB/long term/loan Policy/99 dated 3rd July 1999 for to act as Agricultural & Rural Development Bank Hence this amendment. |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ११(७) – बँकेचे मा० संचालकांना टेलिफोन बिलाच्या भरणा करणेकरिता टेलिफोन खर्च मिळणेबाबत :

ठराव क्रमांक ११(७) – बँकेचे मा० संचालकांना बँकेचे कामाकरिता अनेकदा टेलिफोन करावे लागतात व याकरिता त्यांना स्वःताचे किंवा शेजारचे टेलिफोनच्या नेहमी वापर करावा लागत असतो. याकरिता बँकेकडून टेलिफोन बिलाच्या भरणा करण्यासाठी टेलिफोन खर्च मिळावा म्हणून सभेसमोर विषय आला असतां, विषयांवर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या ज्या संचालकाचे निवासस्थानी स्वतःचे नावाने टेलिफोन असेल किंवा ज्यांचेकडे स्वतःच्या टेलिफोन नाही तथापी बँकेच्या कामाकरिता शेजाऱ्यांकडील किंवा आप्तइष्टांकडील फोनचा वापर करतात. अशा संचालकांनी तशा आशयाचे पत्र व दुरध्वनी क्रमांक सादर केल्यास अशा सर्व संचालकांना दुरध्वनी बिलाची रक्कम अथवा दरमहा रुपये ५००/- यापैकी जी कमी असेल एवढी रक्कम दिनांक १८.९.९९ नंतरचे कालावधीकरिता दुरध्वनी खर्च म्हणून मंजूर करण्यांत येईल. याकरिता संचालकांना दुरध्वनी बिलाची झेरॉक्स किंवा मुळप्रत बँकेकडे सादर करणे आवश्यक राहिल, असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ११(८). बँकेचे अधिकृत भाग भांडवल वाढविणे करिता बँकेचे उपविधीमध्ये दुरुस्ती करणे बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ११(८) – बँकेचे वसुल भाग भांडवल माहे जुलै ९९ मध्ये रुपये ९५३.३७ लाख असून अधिकृत भागभांडवल मर्यादा रु. १०००.०० लाखाची आहे. बँकेचे अधिकृत भाग भांडवल वाढीचे दृष्टिकोणातून ही मर्यादा पुरेसी नसल्याने बँकेचे उपविधीमध्ये दुरुस्ती करणे आवश्यक झाल्याने खालील प्रमाणे उपविधीमध्ये दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. असून सदर दुरुस्तीस बँकेचे वार्षिक साधारण सभेची मंजूरी घेण्यांत यावी असे ठरले.

| Bye law No. | Existing Bye laws. | Amendment proposed | After Amendment of Bye laws. | Reason for Amendment |
|---|---|---|---|---|
| 3(i) | The Authourised share capital of the Bank shall be Rs.1000.00 lakhs | The Authorised share capital of the Bank shall be Rs.2000.00 Lakhs | The Authorised share capital of the Bank shall be Rs.2000.00 lakhs. | The paid-up share Capital of the Bank was Rs.953.37 lakhs. |

| | | | |
|---|---|---|---|
| divided into shares of the following types. | divided into shares of the following types. | divided into shares of the following types. | in the month of July 99 and the limit of authorised share capital is Rs.1000.00 lakhs. which will not be sufficient for increasing share capital Hence the amendment is proposed. |
| Rs.10000000/- "A" Class shares of Rs.1000/- each to be alloted to the state Govt. and/or the state Cooperative Bank. | No. change in 'A' Class shares. | Rs.10000000/- 'A' Class shares of Rs 1000/- each to be alloted to the state Govt. and/or the state cooperative Bank. | |
| Rs.89966000/- 'B' Class shares of Rs.100/- each to be alloted to the Cooperative societies registered under the Maharastra Cooperative Societies Act and other institutions as provided in bye law 9(i) | Rs.189966600/- 'B' Class shares of Rs.100/- each to be alloted to the Cooperative societies registered under the Maharastra Cooperative societies Act and other institutions as provided in byelaw 9(i) | Rs.189966600/- 'B' Class shares of Rs.100/- each to be alloted to the Cooperative societies registered under the Maharastra Cooperative societies Act and other institutions as provided in bye law 9(i) | |
| Rs.33400/- 'C' class shares of Rs.100/- each already alloted to the individual member. However no new members shall be admitted to individual membership hereafter. | No. change in 'C' Class shares. | Rs.33400/- 'C' Class shares of Rs.100/- each already alloted to the individual members. However no new members shall be admitted to individual membership hereafter. | |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ११(९) – बँकींग रेग्युलेशन अॅक्ट १९४९ कलम ३१ प्रमाणे बँकेचे नफातोटा पत्रक व ताळेबंद पत्रक लेखा परिक्षकांचे अहवालासह प्रसिध्द करण्यासाठी मुदतवाढ मिळणेसाठी विनंती करणे.

ठराव क्रमांक ११(९) – बँकींग रेग्युलेशन अॅक्ट १९४९ कलम ३१ प्रमाणे बँकेचे नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक लेखा परिक्षकांचे अहवालासह प्रसिध्द करण्यासाठी मुदतवाढ मिळावी याकरिता रिझर्व बँकेकडे विनंती करणेसाठी खालील प्रमाणे ठराव करण्यांत येत आहे.

– RESOLUTION –

"Resolved that Reserve Bank of India, be and is requested to grant extension up to 30th November 1999 under section 31 of the Banking Regulation Act. 1949 for publications / submission of Balance Sheet, Profit and loss account for the year ending 31st March 1999 along-with the Auditor's certificate".

passed unanimously

---

यानंतर उपस्थितांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक — अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, नागपूर.

बँकेच्या मा० संचालकमंडळाची सभा मंगळवार दिनांक २६.१०.९९ रोजी सकाळी ११.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयांतील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत" बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली.

या सभेला खालिल मान्यवर उपस्थित होते.

— उपस्थित —

| | |
|---|---|
| १. मा. श्री सुनिल केदार | अध्यक्ष |
| २. मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. मा. श्री र. पां. गावंडे | संचालक |
| ४. मा. श्री र. गो. बंग | " |
| ५. मा. श्री. भा. चं. शहाणे | " |
| ६. मा. श्री. अ. रा. गुप्ता | " |
| ७. मा. श्री. व. भा. वांढे | " |
| ८. मा. श्री. अ. य. गुजर | " |
| ९. मा. श्री. सं. वि. चोरे | " |
| १०. मा. श्री. शा. ग. धवड | " |
| ११. मा. श्री. वि. रा. हुलके | " |
| १२. मा. श्री. वि. जा. राऊत | " |
| १३. मा. श्री. वि. वि. निमजे | " |
| १४. मा. श्री. ग. के. शाहिर | " |
| १५. मा. श्री. श्रा. नि. निमजे | " |
| १६. मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १७. मा. श्री. ब. भा. तायवाडे | " |
| १८. मा. श्री. भु. मि. पन्नासे | " |
| १९. मा. श्री अ. शं. धामींक | " |
| २०. मा. श्री. व. क. पाराशिवनीकर | " |
| २१. मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| २२. मा. सौ. स्मिताताई कुंभारे | संचालिका |
| २३. मा. सौ. कुसुमताई किंमतकर | " |

२४. मा. श्री. सु. रा. घोटे, प्रतिनिधी, महा. राज्य सह. बँक म. मुंबई.

२५. मा. श्री. आर. एम. भुसारी, जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपुर

२६. मा. श्री. एल. जी. चौधरी, कर्मचारी प्रतिनिधी

२७. मा. श्री. वी. जी शहाणे, "

२८. मा. श्री. ए. एन. चौधरी सरव्यवस्थापक

- अनुपस्थित -

१. मा. श्री. चं. ल. कोल्हे — संचालक
२. मा. श्री. आ. र. देशमुख — ,,
३. मा. श्री. ना. र. अभिकारे — ,,
४. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर.
५. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (बँक), नागपूर.
६. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.
७. मा. विभागीय अधिकारी, म.रा.सह.बँक लि., विभागीय कार्या. नागपूर

सुरूवातीला सभेला अनुपस्थित असलेले संचालक मा. श्री. चं. ल. कोल्हे, मा. श्री. आ. र. देशमुख, मा. श्री. ना. र. अभिकारे यांचे अनुपस्थितीची नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

सभेच्या विषयपत्रिकेवरील विषयानुसार चर्चा करण्यापूर्वी सहकार नेते पद्मश्री शामरावजी कदम यांचे निधन झाल्यामुळे त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी मा. अध्यक्ष यांनी उपस्थितांना आवाहन केले. त्याप्रमाणे सभेला उपस्थितांनी दोन मिनिटे उभे राहून आपली मुक श्रध्दांजली अर्पण केली. यानंतर खालीलप्रमाणे दुःखवट्याचा ठराव मंजूर करण्यांत आला.

- ठराव -

"सहकार नेते पद्मश्री शामरावजी कदम यांचे हृदयविकाराने दिनांक १५-१०-१९९९ रोजी दुःखद निधन झाले. त्यांनी नांदेड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, नांदेड जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष, कापूस पणन महासंघाचे अध्यक्ष, भारतीय औद्योगिक वित्तीय महामंडळ, दिल्लीचे संचालक अशी अनेक महत्वाची पदे भूषविली आहेत. त्यांच्या मृत्युमुळे आपण सहकारी चळवळीतील एका कुशल संघटकास मुकलो आहोत.

त्यांच्या मृत्युमुळे त्यांच्या कुटुंबियांवर ओढवलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. परमेश्वर त्यांना दुःख सहन करण्याची शक्ती देवो. तसेच मृतकाचे आत्म्यास शांती आणि सदगती देवो ही प्रभूचरणी प्रार्थना."

ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर मा० अध्यक्ष यांनी विषय पत्रिकेवरील विषयांवर — सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली.

विषय क्रमांक १ — मागील दिनांक १८.९.९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ — मागील दिनांक १८.९.९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ — मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा० सरव्यवस्थापक यांनी मागील दिनांक १८.९.९९ रोजी झालेल्या

---

यानंतर मा० अध्यक्ष यांनी विषय पत्रिकेवरील विषयावर सभेच्या कार्यवाहिस सुरुवात केली.

विषय क्रमांक १ — मागील दिनांक १८.९.९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ — मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक १८.९.९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक २ — मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ — मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा० सरव्यवस्थापक यांनी मागील दिनांक १८.९.९९ रोजी झालेल्या मा० संचालक मंडळाचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेला माहिती दिली. सभेत कार्यालयाने कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ — दिनांक २६.१०.९९ रोजी होणाऱ्या वार्षिक साधारण सभेकरिता संस्था प्रतिनिधींकडून आलेल्या सुचनांवर विचार करणे.

ठराव क्रमांक ३ — मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, आज दिनांक २६.१०.९९ रोजी दुपारी १-०० वाजतां बँकेची सन १९९८-९९ ची वार्षिक साधारण सभा होत आहे. या सभेस संस्था प्रतिनिधींना विषय पत्रिकेवरील

विषयांवर अधिकची माहिती अगर स्पष्टीकरण पाहिजे असल्यास त्याची सुचना लेखी स्वरुपांत दिनांक १६.१०.९९ पर्यंत बँकेचे मुख्य कार्यालयाकडे पाठविण्याबाबत सर्व सभासदांना नोटीसद्वारे कळविण्यांत आले होते. सदर मुदतीत दोन संस्था प्रतिनिधीकडून तसेच विणकर संस्थांचे चार प्रतिनिधीकडून सुचना आलेल्या आहेत. या सुचनाबाबत कार्यालयाने खुलासा तयार केला असून आहे. सदर खुलासा मा० अध्यक्ष महोदय यांनी आलेल्या सुचना व त्यासंबंधी कार्यालयाने केलेल्या खुलाशाचे सभेसमोर वाचन केले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या दिनांक २६.१०.९९ रोजी होणाऱ्या वार्षिक साधारण सभेकरिता प्रतिनिधीकडून आलेल्या सुचनांची व या अनुषंगाने बँकेतर्फे करण्यांत आलेल्या खुलाशाची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ४ - घरबांधणी कर्ज धोरणास अंतिम मान्यता देणे.

ठराव क्रमांक ४ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, नागपूर जील्ह्यातील ग्रामिण कार्यक्षेत्रांत तालुक्याचे ठिकाणी व नगरपरिषद कार्यक्षेत्रांत घरबांधणी / फ्लॅट खरेदीसाठी कर्जपुरवठा करण्याचे धोरण दिनांक २०.३.९९ रोजी झालेल्या सभेत ठराव क्रमांक ८ प्रमाणे मंजूर करण्यांत आले आहे. मागील दिनांक १८.६.९९ रोजीचे सभेत ठरल्याप्रमाणे सदर कर्जपुरवठा धोरणास कर्ज वाटपाचे दृष्टीने अंतिम मान्यता देणेसाठी सर्वसमावेशक असे कर्जपुरवठा धोरण सभेत ठेवण्यांत आले आहे.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन नागपूर जिल्ह्यातील ग्रामिण कार्यक्षेत्रांत, तालुक्याचे ठिकाणी व नगर परिषद कार्यक्षेत्रांत घर बांधणी / फ्लॅट खरेदीसाठी वैयक्तिक कर्जपुरवठा अंतर्गत कर्जपुरवठा करण्याचे दृष्टीने खालील कर्ज मंजूरीचे धोरण व कार्यपध्दती मंजूर करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

घर बांधणी कर्ज मंजूरीचे धोरण व कार्यपध्दती

१.) अर्जदार नागपूर जील्ह्यातील रहिवासी असावा. व घरबांधणी / फ्लॅट खरेदीची मागणी तालुक्याचे ठिकाणी किंवा नगरपरिषद कार्यक्षेत्रातील स्वमालकीचे जागेवर बांधकामासाठी असावी. जागा गैरकृषि झालेली असावी.

२) अर्जदाराला बँकेचे नाममात्र सभासद व्हावे लागेल.

३). या कर्जासाठी स्थावर मालमत्ता धारक अथवा सरकारी नोकर-
दार असे दोन जमानतदार आवश्यक राहिल व जमानतदाराला सुद्धा
बँकेचे नाममात्र सभासद व्हावे लागेल. रुपये १००/- चे स्टँम्प पेपरवर
जमानतपत्र भरुन द्यावे लागेल.

४) अ) अर्जदार शेतकरी असल्यास त्याचे स्वमालकीची ५.०० एकर -
बारमाही किंवा १० एकर हंगामी ओलीताची शेती असावी.

ब) अर्जदार पगारदार नोकर किंवा व्यावसायिक असल्यास त्याची
परतफेड क्षमता विचारांत घेतल्या जाईल.

५) कर्जाची कमाल मर्यादा रुपये ५.०० लाख किंवा बांधकाम एस्टिमेट
रकमेच्या ८०% प्रमाणे येणारी रक्कम किंवा परतफेडीची क्षमता लक्षांत
घेऊन जी रक्कम कमी असेल ती रक्कम कर्ज मंजूर करण्यांत येईल.
(कर्ज परतफेडीची क्षमता वार्षिक उत्पन्नाच्या ३ पट गृहित धरण्यांत येईल)

६) या कर्जाची मर्यादा मोठ्या स्वरुपाची असल्याने परतफेडीची सांगड
शेतकरी सभासदाचे कुटुंबात जोडधंदा / व्यवसाय किंवा नोकरी कुटुंबा-
तील सदस्य करीत असल्यास त्यास सहकर्जदार संबोधून त्याची मिळकत
परतफेडीसाठी गृहीत धरण्यांत येईल.

७) अर्जदार व जमानतदार हे कुठल्याही राष्ट्रियकृत किंवा भूविकास
बँकेचे तसेच सहकारी संस्थेचे थकबाकीदार नसावे. त्यासाठी कार्यक्षेत्रा-
तील बँकेचे / संस्थांचे तसे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

८.) अर्जदाराला बांधकाम ज्या ठिकाणी करावयाचे आहे तेथील ग्रामपंचा-
यत / नगर परिषदेकडून बांधकामाचा नकाशा मंजूर करुन घ्यावा लागेल व
मंजूर नकाशाप्रमाणेच बांधकाम करावे लागेल. या बांधकामासाठी बँकेने
मंजूर केलेल्या रकमेतून खालीलप्रमाणे ४ हप्त्यांत उचल देण्यांत येईल.

अ.) अर्जदाराला स्वगुंतवणुकी पोटी प्लींथ पर्यंतचे बांधकाम पूर्ण करावे लागेल.

ब.) प्लींथ लेवलपर्यंत बांधकामासाठी झालेल्या खर्चाची बीले व विवरण
पत्रक बँकेकडे सादर करुन प्रथम कर्ज हप्ता मिळण्यासाठी बँकेकडे अर्ज
सादर करावा लागेल.

क) खर्चाची विवरण पत्रके / बीले शाखेकडे प्राप्त झाल्यानंतर बँक
निरिक्षकाने बांधकामाची प्रत्यक्ष स्थळ तपासणी करुन अहवालासह
बँकेचे पॅनेलवरील वास्तुशिल्पकार यांचेकडून तपासून घेऊन
खर्चाचे ८०% अथवा मंजूर मर्यादेचे ३०% यांत कमी असलेली
रक्कम अर्जदाराचे खात्यांत जमा करावी व अशा रितीने पुढील
बांधकामासाठी अर्जदारास कर्ज रक्कम उपलब्ध करुन द्यावी.

३) याप्रमाणे दुसरा हप्ता लिंटल लेवलपर्यंत बांधकाम झाल्यानंतर एकूण खर्चाचे ८०टक्के अथवा मंजूर मर्यादेच्या ३०टक्के यात कमी असलेली रक्कम अर्जदारांच्या खात्यांत जमा करावी.

३) वरीलप्रमाणे तिसरा हप्ता स्लॅब पूर्ण झाल्यावर झालेल्या कामाचे खर्चाचे ८०टक्के अथवा मंजूर मर्यादेच्या ३०टक्के यांत कमी असलेली रक्कम अर्जदाराच्या खात्यांत जमा करावी.

४) चवथा व अंतिम हप्ता संपूर्ण बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे शिफारशीसह कम्प्लीशन सर्टिफिकेट प्राप्त झाल्यानंतर झालेल्या एकूण खर्चाचे ८०टक्के अथवा मंजूर मर्यादेच्या १०% यांत कमी असलेली रक्कम अर्जदाराचे खात्यांत जमा करून अर्जदारास अदा करावी.

९) नैसर्गिक आपत्ती व आग यापासून होऊ शकणाऱ्या हानीचे सुरक्षिततेसाठी घराचा विमा कर्जदार व बँक यांचे संयुक्त नांवाने काढून पॉलिसी शाखेला सादर करावी लागेल. तसेच या पॉलिसीचे वेळोवेळी नुतनीकरण करण्याची जबाबदारी कर्जदारांची राहील. वेळीच नुतनीकरण न केल्यास बँक विमा पॉलिसीचे नुतनीकरण करून येणारा खर्च कर्जदाराचे नांवे टाकण्यांत येईल.

१०) कर्जावरील व्याज दर द.सा.द.शे. १५टक्के राहील. कर्ज थकीत झाल्यास १टक्का जादा दराने व्याज आकारणी केली जाईल. व्याज दरामध्ये वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार बँकेला राहील.

११) या कर्जाचे परतफेडीचा कालावधी जास्तीत जास्त ११ वर्षे राहील व कर्ज रकमेची परतफेड कर्जदाराला वार्षिक समान हप्त्यांत व्याजासह करावी लागेल.

कर्ज परतफेडीचा प्रथम हप्ता कर्जाचे प्रथम हप्त्याची उचल केल्यापासून १२ महिन्यांनी वसुलीस पात्र होईल. त्यासाठी अर्जदाराला कर्ज मंजूरीनंतर ६ महिन्यांमध्ये कर्जाची उचल करून बांधकाम पूर्ण करावे लागेल.

१२) कर्ज मागणी अर्ज बँकेचे मुख्य कार्यालयांत बिगर शेती कर्ज विभागांत रुपये १००/- जमा घेऊन देण्यांत येईल.

१३) कर्ज मागणी अर्ज पूर्ण भरून आवश्यक कागदपत्रासह बांधकामाचे ठिकाणी असलेल्या स्थानिक शाखेमार्फत सादर करावा लागेल.

१४) कर्ज मंजूरीपूर्वी अर्जदाराला प्लॉट किंवा फ्लॅट कुठल्याही वित्त संस्थेकडे गहाण नसल्याच्या बँकेचे पॅनेलवरील वकीलास खात्री करून घ्यावी लागेल. यासाठी २० वर्षाचा सर्च रिपोर्ट घ्यावा लागेल.

१५) वकिलाचा व वास्तुशिल्पकाराचा खर्च अर्जदारास करावा लागेल.

१६) कर्ज मागणी अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१) बांधकामाची जागा स्वमालकीची असल्याबाबतची मुद्द कागदपत्रे

तसेच गृहनिर्माण सहकारी संस्था असल्यास बांधकामाची जागा स्वमालकीची असल्याबाबतची कागदपत्रे, मालकीहक्क दर्शविणारे दस्तऐवज उदा० खरेदी खत, ७/१२, अद्यावत टायटल व्हेरीफिकेशन रिपोर्ट, बांधकामाचा मंजूर नकाशा, लेआऊट नकाशा इ० तत्सम कागदपत्रे तसेच जमिन गैरकृषि झाल्याचा आदेश.

२) बांधकामाचा तपशिल अपेक्षित खर्चाचे वास्तुशिल्पकाराने प्रमाणित केलेले अंदाजपत्रक.

३) बांधकामासाठी नगर परिषद / ग्रामपंचायतीची परवानगी.

४) टायटल व्हेरीफिकेशन रिपोर्ट बँकेचे पॅनेलवरील वकील व बांधकाम अंदाजपत्रक बँकेचे पॅनेलवरील वास्तुशिल्पकाराकडून प्रमाणित करुन घ्यावे लागेल. यासाठी येणारा खर्च व फी अर्जदारास द्यावी लागेल.

ज्या प्लॉटवर घर बांधावयाचे आहे तो प्लॉट व त्यावर बांधकाम होणारी प्रस्तावित वास्तू किंवा बँकेला रजिस्टर्ड गहाण करुन द्यावी लागेल.

अर्जदार फ्लॅट खरेदीदार असल्यास संबंधित फ्लॅट रजिस्टर्ड गहाण करुन द्यावा लागेल. त्यासाठी गृहनिर्माण संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

वरील बाबींसाठी येणारा खर्च अर्जदारांस करावा लागेल.

१७) अ) अर्जदाराचे सहकर्जदार ज्या ठिकाणी नोकरीला असेल त्या कार्यालय प्रमुखाचे सहकार कायदा कलम ४९(२) नुसार कर्ज वसुलीचे हमीपत्र, पगाराचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

ब) अर्जदार किंवा सहकर्जदाराच्या व्यवसाय / जोडधंदा असल्यास त्या बाबतचे कागदपत्रे सादर करावे लागेल.

याबाबत कर्ज परतफेडीची जबाबदारी स्विकारीत असल्या बाबतचे रु.५०.००-चे स्टॅम्पपेपरवर सह्या प्रमाणित केलेले संमती पत्र सादर करावे लागेल.

१८) सहकारी गृहनिर्माण संस्थेचा गाळा खरेदीसाठी खालील जादा कागदपत्रे सादर करावी लागेल.

अ) संस्थेचा सभासद असल्याबाबत व भाग धारण केल्याबाबतचे प्रमाणपत्र

ब) गाळा गहाण / बोजा निर्माण करण्यास संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र

क) अर्जदाराने संस्थेकडे गाळा खरेदीपोटी भरलेल्या रकमांच्या पावत्यांची झेरॉक्स प्रत (बँकेचे अधिकाऱ्यांचे मुळप्रतिवरुन प्रमाणित केलेली असावी.)

३) संस्थेचे उपविधी / नोंदणी पत्राची प्रमाणित प्रत.
ड) ज्या जमिनीवर बांधकाम होत आहे, त्याचा पूर्ण मालकी हक्क, संस्थेचा असून ती जागा बोझा विरहित असल्याबाबत बँकेचे अधिकृतवकिलाचे टायटल वेरिफिकेशन रिपोर्ट.

१९) बिल्डरकडून गाळा खरेदी करीत असल्यास खालील जादा कागदपत्रे जोडावी.
अ) जागा खरेदी खताच्या (सेल डीड) रजिस्ट्रारकडून पंजीबध्द केलेल्या खताची प्रमाणित प्रत, व गाळा विक्रीबाबत कराराची मुळ प्रत.
ब) इमारत बांधकाम करीत असलेल्या जागेवर मालकी हक्क व बोझा नसल्याबाबत बँकेचे अधिकृत वकिलाचा टायटल वेरिफिकेशन रिपोर्ट.
क) बांधकामापोटी भरलेल्या रकमेच्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रत (बँकेचे अधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या)
ड) बिल्डरकडून गाळ्यावर बोझा निर्माण करण्याचे "ना हरकत प्रमाणपत्र".
ई) गाळा विक्री करारानुसार कर्ज रक्कम अदा करण्यांत येईल.

२०) कर्जदार सभासद मैयत झाल्यास त्यांचेकडून घेणे असलेली व्याजासह कर्जबाकी परतफेड करण्याची जबाबदारी कर्जदार सभासदांचे वारसदार तसेच एकत्रीत कुटुंबावर राहिल. याबाबतचे रुपये १००/-चे स्टॅंप पेपरवर हमीपत्र सादर करावे लागेल.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५ - 'शेत हवेली' कर्ज धोरणास अंतिम मान्यता देणे.

ठराव क्रमांक ५ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, दिनांक २०-३-१९९९-चे सभेतील ठराव क्रमांक १० (१)-चे निर्णयानुसार नागपूर जील्ह्यातील प्रगतीशील शेतकऱ्यांना स्वमालकीच्या शेतामध्ये सर्व सुखसोयीयुक्त "शेत हवेली" बांधण्यासाठी बँकेमार्फत वैयक्तीक कर्जपुरवठ्या अंतर्गत रुपये १०-०० लाख पर्यंत कर्ज पुरवठा करण्याचे धोरण मंजूर करण्यांत आले. मागील दिनांक १८-९-१९९९-चे सभेत ठरल्याप्रमाणे सदर कर्जपुरवठा धोरणास कर्ज वाटप करण्याचे दृष्टीने अंतिम मान्यतेसाठी सर्वसमावेशक असे कर्जपुरवठा धोरण सभेत ठेवण्यांत आले आहे.

विषयाचे अनुषंगाने विषयावर सविस्तर चर्चा होऊन शेतकऱ्यांना स्वमालकीच्या शेतामध्ये सर्व सुखसोयीयुक्त "शेत हवेली" बांधण्यासाठी खालील कर्ज मंजुरीचे धोरण मंजूर करण्यांत आले असे सर्वानुमते ठरले.

"शेत हवेली" कर्ज मंजूरीचे धोरण

१. या योजनेअंतर्गत कर्ज मागणी करणारा शेतकरी आर्थिक दृष्ट्या सक्षम असावा, तसेच आयकर भरणारा असावा.

२. अर्जदाराकडे स्वमालकीची किमान ५.०० एकर बारमाही ओलीत अथवा १०.०० एकर हंगामी ओलीताची शेत जमीन असावी.

३. अर्जदार शेत हवेली ज्या शेतात बांधणार आहे. त्याबाबत मा. तहसिलदार राजस्व विभाग यांची परवानगी जरुरी आहे. परवानगी पत्रांत शेत सर्व्हे नंबर व बांधकामाचे क्षेत्रफळ यांचा उल्लेख असणे आवश्यक राहील.

४. अर्जदारास शेत हवेलीकरिता जास्तीत जास्त रुपये १०.०० लाखापर्यंत किंवा शेतहवेली बांधकाम एस्टीमेटच्या ८० टक्के येणारी रक्कम यांत जी रक्कम कमी असेल त्या रकमेपर्यंत कर्ज मंजूर करण्यांत येईल.

५. या कर्जाची कमाल मर्यादा रुपये १०.०० लाख असल्याने शेत जमिनी पासून मिळणारे उत्पन्नाचे प्रमाणांत कर्ज परतफेडीची क्षमता नियत असल्यामुळे सभासदांकडे व्यवसाय / नोकरी मधील उत्पन्न या दोन्हीची सांगड विचारांत घेऊनच कर्ज मर्यादा मंजूर करण्यांत येईल. परंतु ही मर्यादा एकूण वार्षिक उत्पन्नाचे दुपटीपेक्षा जास्त असणार नाही.

६. या कर्जासाठी अर्जदाराला कर्ज रकमेच्या १½पट किंमतीची स्वमालकीची स्थायी मालमत्ता बँकेचे तारणांत द्यावी लागेल. या मालमत्तेमध्ये शेत हवेलीचे बांधकाम करणार असलेली संपूर्ण शेतजमीनीची किंमत व स्वमालकीच्या इतर मालमत्तेच्या किंमतीचा समावेश गृहीत धरण्यांत येईल.

७. अर्जदाराने सादर केलेल्या जमिनीच्या ७/१२ मध्ये एकापेक्षा अधिक भागधारक असल्यास भागधारकाने संमतीपत्र रु.५०/- चे स्टँप पेपर वर सह्या / अंगठे प्रमाणित केलेले अर्जासोबत सादर करावे लागेल.

८. या कर्जासाठी अर्जदाराला दोन जमानतदार द्यावे लागतील. जमानतदाराकडे स्थावर मालमत्ता असणे आवश्यक राहील. तसेच जमानदार इतर कोणत्याही बँकेचे थकित कर्जदार नसावे यासाठी इतर बँकांचे "नो ड्युज" प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

९. अर्जदार व जमानतदार यांना बँकेचे नामधारी सभासद व्हावे लागेल.

१०. कर्ज मागणी अर्ज बँकेचे मुख्य कार्यालयांत कर्ज विभागामध्ये रुपये १००/- भरून मिळेल.

११. कर्ज मंजूरीपूर्वी अर्जदाराला त्याची जमीन व इतर मालमत्ता

कुठल्याहि वित्त संस्थेकडे गहाण नसल्याची बँकेचे पॅनेलवरील वकीलास खात्रीकरुन घावी. लागेल. बँकेचे पॅनेलवरील वकिलांची नांवे मुख्य कार्यालयाकडून कळविण्यांत येईल. वकिलाचा खर्च मात्र सभासदाला करावा लागेल.

१२. कर्ज मागणी अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

अ). शेतजमिनीच्या ७/१२, ८(अ) व नकाशा.

ब). बारमाही/हंगामी ओलिताचे प्रमाणपत्र

क). जमिनीचे किंमतीबाबत सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट

ड). आयकर भरणा केल्याच्या असेसमेंट ऑर्डर किंवा विवरणपत्राची सत्य प्रत.

ई). वास्तु शिल्पकाराने तयार केलेल्या प्रस्तावित शेत हवेली बांधकामाच्या नकाशा व बांधकामासाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक.

फ). शेतजमीन असलेल्या हलक्यामधील इतर व्यापारी बँका, भूविकास बँक यांचे कर्ज नसल्याचे दाखले तसेच सेवा सहकारी संस्थांचे कर्ज थकित नसल्याचा दाखला.

ग). अर्जदाराची कर्ज परतफेडीची क्षमता ठरविण्यासाठी शेत जमीनी पासून मिळणाऱ्या उत्पन्नासाठी मा. तहसिलदार, व्यवसायापासून मिळणाऱ्या उत्पन्नासाठी चार्टर्ड अकांऊटंट तसेच नोकरी असल्यास कार्यालयीन प्रमुखाचा दाखला.

१३. वरील संपूर्ण कागदपत्रासह कर्ज मागणी अर्ज बँकेच्या नजदिकच्या शाखेत सादर करावा लागेल.

१४. कर्ज मर्यादा मंजुरीनंतर कर्जाचे वितरण प्रत्येक वेळी कामाची पाहणी करुन बँकेचे समाधान झाल्यानंतरच खालील प्रमाणे ४ हप्त्यात करण्यांत येईल.

अ) अर्जदारास प्लिंथपर्यंतचे बांधकाम स्वगुंतवणुकीने करावे लागेल.

ब) कर्जाचा प्रथम हप्ता मिळणेसाठी बँकेकडे अर्ज करुन अर्जासोबत झालेल्या खर्चाचे विवरण, बीले सादर करावी लागेल.

क) खर्चाचे विवरण पत्र/बीले शाखेला प्राप्त झाल्यानंतर बँक निरिक्षकाने बांधकामाची प्रत्यक्ष स्थळ तपासणी करुन अहवालातील बँकेचे पॅनेलवरील अधिकृत वास्तू शिल्पकार यांचेकडून तपासून घेऊन खर्चाचे ८० टक्के अथवा मंजूर मर्यादेच्या ३० टक्के रक्कम अर्जदाराचे खात्यांत जमा करावी व अशा तऱ्हेने पुढील बांधकामासाठी अर्जदारास कर्ज रक्कम उपलब्ध करुन घावी.

ड) याचप्रमाणे दुसरा हप्ता लिंटल लेव्हलपर्यंत बांधकाम झाल्यानंतर एकूण खर्चाचे ८० टक्के अथवा मंजूर मर्यादेच्या ३० टक्के यात कमी असलेली रक्कम अर्जदाराच्या खात्यात जमा करावी.

ई) वरीलप्रमाणे तिसरा हप्ता स्लॅब पूर्ण झाल्यानंतर आलेल्या कामाचे

खर्चाच्या ८० टक्के अथवा मंजूर मर्यादेच्या ३०टक्के यांत कमी असलेली रक्कम अर्जदाराच्या खात्यांत जमा करावी.

प) चौथा अथवा व अंतिम हप्ता संपूर्ण बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्प कारांचे शिफारशीसह कम्प्लेशन सर्टिफिकेट प्राप्त झाल्यानंतर झालेल्या एकूण खर्चाचे ८० टक्के अथवा मंजूर मर्यादेच्या १०टक्के यांत कमी असलेली रक्कम अर्जदाराचे खात्यांत जमा करून अर्जदाराला अदा करावी.

३) बँकेचे पॅनेलवरील अधिकृत वास्तुशिल्पकार यांची नांवे शेरेवाला कळविण्यांत येईल, वास्तुशिल्पकाराचा खर्च मात्र अर्जदारालाकरावा लागेल.

१५. या कर्जावरील व्याज दर दर सा० द० शे० १८ टक्के राहील. कर्ज थकित झाल्यास १टक्का दराने जादा व्याज आकारण्यांत येईल. व्याजदरांत बदल करण्याचा अधिकार बँकेला राहील.

१६. या कर्जाचे परतफेडीची मुदत ११ वर्षे राहील. अर्जदारास कर्ज मंजूरी पासून ६ महिन्याचे आंत कर्जउचल घेवून बांधकाम पूर्ण करावे लागेल. कर्जाची परतफेड समान ११ वार्षिक हप्त्यात करावी लागेल. कर्ज परतफेडीचा प्रथम हप्ता व्याजासह प्रथम कर्ज उचलीपासून १२ महिन्यांनी परतफेडीस पात्र राहील. कर्जाची परतफेड ही हंगामनिहाय सुध्दा अर्जदारास करता येईल. अशावेळी दर सहा महिन्यांनी मुद्दल हप्ता व व्याज वसुलीस पात्र राहील.

१७. कर्जदार सभासद मयत झाल्यास संस्थेकडून घेणे असलेली मुद्दल कर्ज बाकी व्याजासह संपूर्ण परतफेडीस कर्जदार सभासदांचे वारस तसेच एकत्रित कुटुंब जबाबदार राहील. याबाबतचे हमीपत्र रुपये १००/-चे स्टॅम्प पेपरवर द्यावे लागेल.

१८. कर्जाचे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून 'शेत हवेली' चा विमा बँक व कर्जदार सभासद यांचे संयुक्त नांवाने काढून पॉलीसी शाखेला सादर करावी लागेल. पुढे दरवर्षी विम्याचे नुतनीकरण मुदतीचे आंत करण्याची जबाबदारी कर्जदाराची राहील. वेळीच नुतनीकरण न झाल्यास बँक विम्याचे नुतनीकरण करून घेईल व येणाऱ्या खर्चाची रक्कम कर्जदाराचे कर्ज खाते नांवे करण्यांत येईल.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६ - सन १९९९-२००० करीता करावयाच्या शेतकी कर्ज वसुली बाबतच्या कृती कार्यक्रमास (Action Plan) मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ६ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला

माहिती देतांना सांगितले की, कर्ज वाप्य वाढविण्याचे दृष्टीने प्रयत्न होत असतांना कर्ज वसुली होणे आवश्यक आहे. थकबाकीचे प्रमाण वाढू नये यासाठी कर्जवसुलीकडे प्राधान्याने लक्ष देणे गरजेचे आहे सन १९९९-२००० करिता सहकारी संस्थेकडून असलेल्या शेतकी कर्जाची वसूली करण्याचे दृष्टीने करावयाच्या आवश्यक कार्यवाही बाबत तसेच कर्ज वसुलीशी संबंधित कर्मचारी, अधिकारी व पदाधिकारी यांचेकडून अपेक्षित असलेल्या कार्यवाहीच्या कृती कार्यक्रम सभेच्या स्विकृतीकरिता ठेवला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन सन १९९९-२००० करिता करावयाच्या शेतकी कर्ज वसुलीच्या कृती कार्यक्रमास स्विकृती देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ७ – मा० अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ७(१) – शासकीय वसुली अधिकारी यांचे पगारावर झालेला खर्च शासकीय खजिन्यांत भरणा करण्याबाबत..

ठराव क्रमांक ७(१) – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मा० जील्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक जिउनि/वसुली/सरचार्ज/५७४६/९९ दिनांक २०.३.९९ नुसार बँकेवर कार्यरत असलेले वसुली अधिकारी व त्यांचा कर्मचारीवर्ग यांचे पगारावर एप्रिल ९८ ते फरवरी ९९ पर्यंत रु.२७५४७०.०० खर्च झालेला असल्यामुळे व यापोटी बँकेने कांहीही भरणा केला नसल्यामुळे ही संपूर्ण रक्कम शासकीय खजिन्यांत भरणा करण्याबाबत कळविले आहे.

शासकीय वसुली अधिकारी यांचे पगारावरील खर्च व सरचार्ज वसुलीबाबत माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | खात्याचे वसुली अधिकारी | पगारावरील झालेला खर्च | त्यांनी वसूल केलेला सरचार्ज | शासनाचे सरचार्ज खाती शिल्लक | शासकीय खजिन्यांत भरावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | वसुली अधिकारी नागपूर (लिपिकासह) | १४६४८८.०० | ७०००.०० | ८९६.७९ | २७५४७०.०० |
| २. | वसुली अधिकारी पारशिवनी (लिपिकासह) | १२८९८२.०० | ७०००.०० | | |
| | टाकूण | २७५४७०.०० | १४०००.०० | ८९६.७९ | २७५४७०.०० |

सन १९९८-९९ या हंगामात नापीकीमुळे वसुलीची कारवाई न झाल्याने सरचार्ज वसुली कमी झालेली आहे. शासनाचे सरचार्ज खात्याला आज फक्त रुपये ८६९१९ शिल्लक आहेत. वरीलप्रमाणे पगारावर झालेला खर्च शासकीय खजिन्यांत भरणे आवश्यक असल्याने ही रक्कम बँकेला भरणा करावी लागेल.

सद्यःस्थितील दिनांक १२.४.१९९९ ला बँकेचे वसुली अधिकाऱ्यांनी वसूल केलेली सरचार्जची रक्कम रुपये २१२०३०६/- मुख्य कार्यालयाचे सरचार्ज खात्याला शिल्लक आहे. या खात्यातून वरीलप्रमाणे भरणा करावयाची रक्कम रुपये ८७५४७०/- शासकीय खजिन्यांत भरणा करावी लागेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन शासकीय वसुली अधिकाऱ्यांचे पगारावर झालेल्या खर्चाची रक्कम रुपये ८७५४७०/- बँकेचे वसुली अधिकारी यांनी वसूल केलेल्या सरचार्ज खात्यातून शासकीय खजिन्यांत भरण्यास मंजूरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७(२) - बँकेच्या कर्मचाऱ्यांना सन १९९८-९९ सालच्या बोनस/ एक्सग्रेसीया मंजूर करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७(२) - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चेचे वेळी बँकेला नफा मिळवून देण्यांत कर्मचाऱ्यांचाही सहभाग असल्याने सन १९९८-९९ सालाकरिता १३-१४ टक्के बोनस/एक्सग्रेसीया त्यांना देण्यांत यावा अशी सुचना मा० श्री. र. त्र्यं. निमजे यांनी केली. परंतु नफ्याचा विनियोग करतांना कर्मचारी बोनस/एक्सग्रेसीया साठी ८.३३ टक्के प्रमाणे रुपये ४२१५०००/- ची तरतुद करण्यांत आली आहे. १३-१४ टक्के प्रमाणे कर्मचाऱ्यांना बोनस/एक्सग्रेसीया देण्याकरिता ही रक्कम कमी पडत असल्याने इमारत फंडाकरिता तरतुद केलेल्या रकमेपैकी काही रक्कम बोनस/एक्सग्रेसीया फंडाला वळती केल्यास कर्मचाऱ्यांना १३ टक्के बोनस/एक्सग्रेसीया देता येवू शकतो अशी माहिती मा० अध्यक्ष महोदय यांनी दिली.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कर्मचाऱ्यांना १३ टक्के दराने बोनस/ एक्सग्रेसीया देणेकरिता नफ्याचा विनियोग करतांना इमारत फंडाकरिता तरतुद केलेल्या रकमेपैकी आवश्यक असलेली रक्कम बोनस/एक्सग्रेसीया फंडाला वळती करणेसाठी बँकेचे वार्षिक साधारण सभेला शिफारस करण्यांत यावी असे ठरले.

सुचक :- मा. श्री. र. त्र्यं. निमजे

अनुमोदक :- मा. श्री. ब. मा. तायवाडे.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७(३) - वर्धा जिल्हा सहकारी बँकेत रुपये १०.०० कोटी गुंतविण्यास परवानगीसाठी मा॰ विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणेबाबत केलेल्या सर्क्युलर ठरावास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ७(३) - मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. वर्धा जिल्हा सहकारी बँकेनी विनंती केल्याप्रमाणे रुपये १०.०० कोटी गुंतविणेसाठी मा॰ विभागीय सह-निबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांची परवानगी घेणे आवश्यक असल्याने दिनांक १४.१०.१९९९ रोजी खालील प्रमाणे करण्यांत आलेला सर्क्युलर ठराव मान्यतेसाठी सभेत ठेवण्यांत आला आहे.

– सर्क्युलर ठराव –

"दि वर्धा डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि; वर्धा यांनी यांचेकडे रुपये १०.०० कोटीची गुंतवणुक करण्याकरिता विनंती केली आहे. या गुंतवणुकीवर ३० दिवसांकरिता १५ टक्के दराने व्याज देण्याचेही यांनी कबुल केले आहे. इतर कोणत्याही गुंतवणुकीपेक्षा हा व्याजदर जास्त असल्याने वर्धा डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेत ३० दिवसाकरिता १५ टक्के दराने रुपये १०.०० कोटी गुंतवण्यास मा॰ विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे सदर गुंतवणुक करण्यास परवानगी देण्याची विनंती करण्यांत यावी."

ठराव सर्वानुमते मंजूर

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थितांचे आभार मानून मा॰ अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक

अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, नागपूर.

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा बुधवार दिनांक - १।१२।१९९९ रोजी सकाळी ११ वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत" बँकेचे अध्यक्ष माननीय श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

## उपस्थित

| | |
|---|---|
| १. मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. मा. श्री. र. पां. गावंडे | संचालक |
| ४. मा. श्री. र. गो. बंग | ,, |
| ५. मा. श्री. भा. चं. शहाणे | ,, |
| ६. मा. श्री. अ. रा. गुप्ता | ,, |
| ७. मा. श्री. व. भा. वांढे | ,, |
| ८. मा. श्री. चं. ल. कोल्हे. | ,, |
| ९. मा. श्री. आ. र. देशमुख | ,, |
| १०. मा. श्री. भा. श. धवड. | ,, |
| ११. मा. श्री. वि. रा. हुलके | ,, |
| १२. मा. श्री. ना. र. जीभकाटे | ,, |
| १३. मा. श्री. वि. जा. राऊत | ,, |
| १४. मा. श्री. वि. वि. निमजे | ,, |
| १५. मा. श्री. श्रा. नि. निमजे | ,, |
| १६. मा. श्री. र. त्र्यं. निमजे | ,, |
| १७. मा. श्री. अ. शं. धार्मिक | ,, |
| १८. मा. श्री. व. क. पारशिवनीकर | ,, |
| १९. मा. श्री. चं. तु. समर्थ | ,, |
| २०. मा. सौ. सिताताई कुंभारे | संचालिका |
| २१. मा. सौ. कुसुमताई किंमतकर | ,, |
| २२. मा. श्री. कि. जी. शहाणे | कर्मचारी प्रतिनिधी |
| २३. मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

## अनुपस्थित

| | |
|---|---|
| १. मा. श्री. अ. य. गुजर | संचालक |

२.मा.श्री. सं.लि. चोरे — संचालक
३. मा. श्री. ग. के. शाहीर — "
४. मा.श्री. ब. भा. तायवाडे — "
५. मा.श्री. मु. भि. पन्नासे — "
६-मा. अध्यक्षा, जील्हा परिषद, नागपूर — प्रतिनिधी
७. मा. श्री. सुभाषराव थोटे, प्रतिनिधी, म.रा. सह. बँक मर्या. मुंबई.
८ मा. जील्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
९. मा० विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१ सहकारी संस्था (बँक), नागपूर.
१०. मा० सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.
११. मा० विभा० अधिकारी, म.रा. स० बँक लिमी; विभागीय कार्यालय, नागपूर.
१२. मा. श्री. एल० डी० चौधरी — कर्मचारी प्रतिनिधी.

---

सभेचे सुरुवातीला अनुपस्थित असलेले संचालक माननिय श्री आय. गुजर, मा. श्री. सं. लि. चोरे, मा० श्री. ग. के. शाहीर, मा. श्री. ब. भा. तायवाडे आणि मा. श्री. मु. भि. पन्नासे यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली. व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली. यानंतर विषयपत्रिके वरिल विषयानुसार मा० अध्यक्ष यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कार्यवाहीस सुरुवात केली.

---

विषय क्रमांक १ :- मागील दिनांक २६.१०.९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक २६।१०।१९९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक २ :- मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयानुषंगाने मा० सरव्यवस्थापक यांनी सभेला मागील दिनांक २६।१०।१९९९ रोजीचे सभेत पारित झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. सभेत कार्यालयाने कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ३ :- मे. वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज प्रा. लि., नागपूरचा प्रकल्प अहवाल रु. २४४.०० लाख मंजूरीकरिता राज्य सहकारी बँकेमार्फत नाबार्डकडे पाठविण्याबाबत तसेच प्रकल्पास दिर्घ मुदती कर्ज रु. १७०.०० लाख बँकेमार्फत उपलब्ध करून देणेबाबत.

ठराव क्रमांक ३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती दिली की, मे. वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज प्रा. लिमी., नागपूर यांनी कळमना मार्केट यार्ड, नागपूर येथे नव्याने कोल्ड स्टोअरेजची उभारणी साठी रु. २४४.०० लाखाचा प्रकल्प अहवाल तयार केला असुन अहवालांत दर्शविल्यानुसार रु. १७०.०० लाख दिर्घ मुदती कर्ज बँकेकडून उपलब्ध करावयाचे आहे. कोल्ड स्टोअरेजचे भागीदारांना बँकेचे नामधारी सभासद करून घेण्यांत आले आहे. प्रकल्प अहवाला-विषयीची इतर सविस्तर माहिती सभेला देण्यांत आली.

यावर सभेत सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती असे ठरले की, मे. वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज प्रा. लि. नागपूरचे रु. २४४.०० लाखाचे प्रकल्प अहवालास मंजूरी देऊन रु. १७०.०० लाखाचे दिर्घ मुदती कर्ज बँकेमार्फत उपलब्ध करून देण्यांत यावे, असे सर्वानुमते ठरले. सदर प्रकल्प अहवाल नाबार्डचे मान्यतेसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांचे मार्फत पाठविण्यात यावा. सदर प्रकल्पाबाबत नाबार्डने सुचविलेल्या अटी व शर्ती बँकेला मान्य राहील.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ४ :- मे. वाधवानी कोल्ड ~~अँड~~ स्टोअरेज अँड आईस प्लँट प्रा. लि. नागपूर चे विस्तारीकरण करण्याकरिता प्रकल्प अहवाल रु. २३५.०० लाख मंजूरीकरिता राज्य सहकारी बँकेमार्फत नाबार्डकडे पाठविणेबाबत तसेच प्रकल्पास दिर्घ मुदती कर्ज रु. १६५.०० लाख बँकेमार्फत उपलब्ध करून देणेबाबत.

ठराव क्रमांक ४ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व विषयाच्या अनुषंगाने सभेला माहिती दिली. मेसर्स वाधवानी कोल्ड स्टोअरेज अँड आईस प्लँट प्रायव्हेट लिमीटेड, नागपूर यांनी यांचे कळमना मार्केट यार्ड, नागपूर येथे कार्यरत असलेल्या कोल्ड स्टोअरेज विस्तारीकरण करण्यासाठी रुपये २३५.०० लाखाचा प्रकल्प अहवाल तयार केला असून अहवालांत दर्शविल्यानुसार रुपये १६५.०० लाख दिर्घ मुदती कर्ज बँकेकडून उपलब्ध करून घ्यावे आहे. कोल्ड स्टोअरेजचे भागीदारांना नामधारी सभासद करून घेण्यांत आले आहे. प्रकल्प अहवाल विषयाची इतर माहिती सभेला

देण्यात आली.

यावर सभेत चर्चा होऊन चर्चेअंती ठरले की, मे. वाधवानी कोल्ड स्टोरेज ॲंड आईस प्लॅंट प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर चे रुपये २३५.०० लाखाचे प्रकल्प अहवालास मंजूरी देऊन रुपये १६५.०० लाख दिर्घ मुदती कर्ज बॅंकेमार्फत उपलब्ध करुन देण्यांत यावे, असे सर्वानुमते ठरले. सदर प्रकल्प अहवाल नाबार्डचे मान्यतेसाठी महाराष्ट्र राज्य सह. बॅंक मुंबई यांचे मार्फत पाठविण्यांत यावा. सदर प्रकल्पाबाबत नाबार्डने सुचविलेल्या अटी व शर्ती बॅंकेला मान्य राहील.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ५ :— मे. गणेश दाल इंडस्ट्रीज मौजा कापसी खुर्द, नागपूर (ग्रामीण) यांचा प्रकल्प अहवाल रु.१२८.०० लाख मंजूरीकरिता राज्य सहकारी बॅंकेमार्फत नाबार्डकडे पाठविणेबाबत, तसेच प्रकल्प उभारणीस दिर्घ मुदती कर्ज रु.७०.०० लाख तथा खेळते भांडवलाकरिता रु.४३.०० लाख बॅंकेमार्फत उपलब्ध करुन देणेबाबत- -

ठराव क्रमांक ५ :— मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व विषयाच्या अनुषंगाने सभेला माहिती दिली. मेसर्स गणेश दाल इंडस्ट्रीज, नागपूर यांनी मौजा कापसी खुर्द तालुका नागपूर (ग्रामीण) येथे कंपनीचे दालमील उभारणीसाठी रुपये १२८.०० लाखाचा प्रकल्प अहवाल केला असून अहवालांत दर्शविल्यानुसार रुपये ७०.०० लाख दिर्घ मुदती भांडवली कर्ज रु.४३.०० लाख खेळते भांडवल पोटी कर्ज बॅंकेकडून उपलब्ध करुन घ्यावयाचे आहे. इंडस्ट्रीचे भागीदारांना नाममात्र सभासद करुन घेण्यांत आलेले आहे. प्रकल्प अहवालाविषयीची इतर माहिती सभेला देण्यांत आली. यावर सभेत चर्चा होऊन चर्चेअंती ठरले की, मेसर्स गणेश दाल इंडस्ट्रीज नागपूरचे रु. १२८.०० लाखाचे प्रकल्प अहवालास मंजूरी देऊन रुपये ७०.०० लाख दिर्घ मुदती भांडवली कर्ज व रुपये ४३.०० लाख खेळते भांडवलाकरिता कर्ज बॅंकेमार्फत उपलब्ध करुन देण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले. सदर प्रकल्प अहवाल नाबार्डचे मान्यतेसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंक, मुंबई यांच्या मार्फत पाठविण्यांत यावा. सदर प्रकल्पाबाबत नाबार्डने सुचविलेल्या अटी व शर्ती बॅंकेला मान्य राहतील.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६ :— तज्ञ समितीने सन २०००-२००१ हंगामाकरिता शिफारस केलेले पीक कर्जाचे एकरी दर व धोरण मंजूर करुन महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंक लिमि. मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणे.

ठराव क्रमांक ६ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयानुसंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, सन २०००-२००१ च्या हंगामाकरिता नागपूर जील्ह्यातील पीक कर्ज दर ठरविण्याकरिता दिनांक २०.११.९९ रोजी झालेल्या मा० तज्ञ समितीने बियाणे, औषधी व खताचे वाढलेले भाव व त्याचबरोबर वाढलेली मजूरी, ओलीताखालील क्षेत्रांत दिवसेंदिवस होणारी वाढ व पिक उत्पादनासाठी आधुनिक पध्दतीचा अवलंब, शेतकऱ्यांचा नगदी पिके घेण्यामागचा कल, नाबार्डचे निकष, शेतीचे प्राथमिक मशागती-करिता मोठ्या प्रमाणावर होणारा खर्च ह्या बाबी विचारांत घेवुन एकरी पिक कर्जदर व धोरण ठरवून शिफारस केली आहे.

विषयावर चर्चा करतांना मा० संचालक श्री अ.रा. गुप्ता म्हणाले की, धान (ओलित) पिकाचे लागवडीकरिता, मशागतीकरिता येणारा खर्च जास्त असल्याने तज्ञ समितीने शिफारस केलेल्या दरांत वाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे धान (ओलित) पिकांचे एकरी दर रु. ३५००/- करण्यांत यावा अशी सुचना केली. ओलिताखालील मिरची करिता दर ठरवितांना मा० संचालक श्री. चं. तु. समर्थ यांनी मिरची (ओलित) पिकांचे एकरी दर वाढविणे आवश्यक वाटते. त्यामुळे ओलिताखालील मिरची पिकांचे एकरी दर रुपये ५०००/- करण्यांत यावे. अशी सुचना केली. मा० संचालक श्री. र. गो. बंग यांनी संत्रा लागवडीकरिता येणारा जास्त खर्च लक्षांत घेता संत्रासाठी प्रति झाड रुपये ६०/- करण्यांत यावे असे सुचविले. या सुचनांवर सभेत चर्चा होवून सर्व मा० संचालकांनी सहमती दर्शविली.

सबब कर्जदर विषयावर सविस्तर चर्चा होवुन खालील प्रमाणे तज्ञ समितीने शिफारस केलेल्या दरांपैकी ओलिताखालील पिके धान, मिरची, संत्रा पिकांकरिता वाढ करण्याविषयी शिफारस करुन सन २०००-२००१ चे हंगामासाठी पिक कर्जाचे एकरी दर व धोरण मंजूर करण्यांत आले. व हे कर्जदर मान्यतेसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., मुंबई यांचेकडे मंजूरीकरिता पाठविण्यांत यावे असे ठरले.

| अ. क्र. | पिकांचे नांव | तज्ञ समितीने शिफारस केलेले दर | | | संचालक मंडळाने मंजूर केलेले दर. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नगदी | वस्तुरुप | एकुण | नगदी | वस्तुरुप | एकुण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | खरीप हंगाम : | | | | | | |
| | (अ) ओलीत पीके - | | | | | | |
| | १. धान अ.ऊ.दे. | २००० | १३०० | ३३०० | २२०० | १३०० | ३५०० |
| | २. ज्वारी अ.ऊ.दे. | १२०० | ८०० | २००० | १२०० | ८०० | २००० |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३. कापूस | १३०० | १६०० | ३९०० | २३०० | १६०० | ३९०० |
| | ४. तूर | १२०० | ८०० | २००० | १२०० | ८०० | २००० |
| | ५. मिरची | २००० | १३०० | ३३०० | ३००० | २००० | ५००० |
| | ६. संत्रा प्रतिझाड | २६ | १८ | ४४ | ४० | २० | ६० |
| | ७. केळी | २४०० | ११०० | ३५०० | २४०० | ११०० | ३५०० |
| | ८. भाजीपाला | १२०० | ८०० | २००० | १२०० | ८०० | २००० |
| | ९. ऊस पूर्व हंगाम | ४४०० | ३६०० | ८००० | ४४०० | ३६०० | ८००० |
| | १०. ऊस सुरु हंगाम | ३९०० | ३१०० | ७००० | ३९०० | ३१०० | ७००० |
| | ११. ऊस खोडवा | ३३०० | २७०० | ६००० | ३३०० | २७०० | ६००० |
| | १२ चारा पीके लुसर्न | ११०० | ७०० | १८०० | ११०० | ७०० | १८०० |
| | १३. चारा पीके बरसीम | ८०० | ५०० | १३०० | ८०० | ५०० | १३०० |
| | १४. अद्रक/लिसुन/हळद | १००० | ५०० | १५०० | १००० | ५०० | १५०० |
| | १५ भाजमळा (मशागत) | १००० | ७०० | १७०० | १००० | ७०० | १७०० |
| | (ब) कोरड पीके | | | | | | |
| | १. कापूस | १७०० | ११०० | २८०० | १७०० | ११०० | २८०० |
| | २. धान | ८०० | ५०० | १३०० | ८०० | ५०० | १३०० |
| | ३. ज्वारी | ११०० | ७०० | १८०० | ११०० | ७०० | १८०० |
| | ४. मिरची | १४०० | १००० | २४०० | १४०० | १००० | २४०० |
| | ५. भुईमुग | १८०० | १२०० | ३००० | १८०० | १२०० | ३००० |
| | ६. सोयाबीन | १५०० | ९०० | २४०० | १५०० | ९०० | २४०० |
| | ७. तूर | १००० | ६०० | १६०० | १००० | ६०० | १६०० |
| २. | रब्बी/उन्हाळी हंगाम | | | | | | |
| | १. गहू अऊदे ओलीत | १५०० | १००० | २५०० | १५०० | १००० | २५०० |
| | २. चना ओलीत | १३०० | ८०० | २१०० | १३०० | ८०० | २१०० |
| | ३. गहू अऊदे कोरड | ८०० | ५०० | १३०० | ८०० | ५०० | १३०० |
| | ४. चना कोरड | ८०० | ६०० | १४०० | ८०० | ४०० | १४०० |
| | ५. जवस | ७०० | ४०० | ११०० | ७०० | ४०० | ११०० |
| | ६. तीळ | ७०० | ४०० | ११०० | ७०० | ४०० | ११०० |
| | ७. करडई/सुर्यफुल | ८०० | ६०० | १४०० | ८०० | ६०० | १४०० |
| | ८. भुईमुग उन्हाळी | २१०० | १४०० | ३५०० | २१०० | १४०० | ३५०० |
| | ९. सोयाबीन | १५०० | ९०० | २४०० | १५०० | ९०० | २४०० |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७ :- बँकेचे मुख्य कार्यालय व चार शाखा या पांच ठिकाणी संगणकीकरण करण्यास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ७ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व विषयानुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकींग व्यवसायांत निर्माण होत असलेल्या तिव्र स्पर्धेच्या काळांत बँकेचे ग्राहकांना सभासदांना चांगली आणि तत्पर सेवा देण्याचे दृष्टीकोनातून बँकेत संगणक बसवून संगणकीकरण करणे आवश्यक वाटले. सुरुवातीला बँकेचे मुख्य कार्यालयांत व शहरांतील ४ शाखा अशा ५ ठिकाणी संगणक बसविण्याकरिता अंदाजे खर्च रुपये ६०.०० लाख अपेक्षित आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे मुख्य कार्यालय व शहरांतील महाल, रामनगर, धंतोली, जिल्हा परिषद शाखा व उमरेड तालुक्यामधील बेडेश्वर शाखा येथे संगणक बसवून संगणकीकरण करण्यांत यावे. संगणक खरेदी करणेसाठी निविदा [Quotation] मागविण्यांत यावे. कोटेशन पात्र झाल्यानंतर निगोशियशन करण्याचे, करारनामा करण्याचे त्याकरिता येणारा खर्च इत्यादि बाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा० अध्यक्ष महोदय यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ८ :- मा० अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ८(१) : सोने तारण कर्ज व्यवहारासाठी सोने तपासनिसाला द्यावयाचे फी बाबत.

ठराव क्रमांक ८(१) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेत सोने तारण कर्ज व्यवहार सुरू असून सोने तपासणीसाठी व सोन्याची किंमत ठरविण्यासाठी सोने तारण कर्ज व्यवहार करणाऱ्या शाखेमध्ये सोने तपासणीसाठी नियुक्ती केलेली आहे. दिनांक ४।११।१९९६ चे मा० संचालक मंडळाचे सभेतील निर्णयानुसार सोने तपासनिसांना सोने तपासणीचे दर ठरविले आहेत. या दरानुसार फी आकारणीची असलेली महत्तम मर्यादा रुपये ५०/- ही अट शिथील करण्याची विनंती सोने तपासनिसांनी केली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन सोने तपासणी फी आकारणीची महत्तम मर्यादा रुपये ५०/- ही अट काढण्यांत यावी व सोने तपासणीचे दर खालील प्रमाणे ठरविण्यांत यावे अशी सर्वानुमते

मंजूरी देण्यांत आली.

१. दागिण्याचे वजन १० ग्रॅम पर्यंत असल्यास ................ रुपये ७०.००

२. दागिण्याचे वजन १० ग्रामचे वर परंतु २५ ग्रामचे आंत असल्यास ... रुपये २५.००

३. दागिण्याचे वजन २५ ग्रॅम किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास ---- प्रतिग्रॅम २१.०० प्रमाणे होणारी रक्कम

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ८(२) :- श्रीराम सहकारी साखर कारखाना लि., बाबदेव यांचे-कडील थकित कर्जबाकी राज्य सहकारी बँकेनी वसुल करुन देणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ८(२) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, जिल्हा सहकारी बँकेने श्रीराम सहकारी साखर कारखाना लिमी., बाबदेव या कारखान्यास सन १९८५-८६ मध्ये खेळते भांडवली कर्ज पुरवठा केला आहे. परंतु त्या कर्जापोटी कारखान्याकडे दिनांक ३०.९.९९ ला मुद्दल रुपये ७४.८४ लाख तर व्याजापोटी रुपये १९२.१६ लाख असे एकूण रुपये २६७.०० लाख थकित बाकी आहे.

सदर थकबाकीचे वसुलीचे दृष्टीकोनातून राज्य सहकारी बँकेचे अधिकारी व साखर कारखान्याचे पदाधिकारी यांचेशी चर्चा तसेच करार होऊनही कर्ज वसुली बाबत कोणतीही प्रगती झालेली नाही त्यामुळे कर्ज वसुलीकरिता नाईलाजास्तव बँकेनी कारखान्यावर कायदेशिर कारवाई सुरु केली असून प्रकरण उच्च न्यायालयांत न्यायप्रविष्ट आहे.

श्रीराम सहकारी साखर कारखान्याचा संपूर्ण कर्ज व्यवहार राज्य सहकारी बँकेकडूनच सुरु आहे. राज्य सहकारी बँक ही सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची पालक बँक आहे. त्यामुळे कारखान्यानी जिल्हा बँकेचे थकविलेले कर्ज वसुल करुन देण्यास सर्वतोपरी सहकार्य करावे ही रास्त अपेक्षा जिल्हा सहकारी बँकेनी करणे स्वाभाविक आहे.

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना भरीव आर्थिक मदत देऊन कारखान्यांना सक्षम करण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार सर्व आवश्यक कर्ज पुरवठा राज्य सहकारी बँकेकडून कारखान्यांना होणार असल्यामुळे श्रीराम सहकारी साखर कारखान्यास सुद्धा सर्व प्रकारचा संपूर्ण कर्ज पुरवठा राज्य सहकारी बँकेकडून व्हावा हे अपेक्षित आहे. अशा स्थितीत श्रीराम सहकारी साखर कारखान्याकडील जिल्हा बँकेची एकूण रुपये २६७.०० लाखाची थकबाकी राज्य सहकारी बँकेनी नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून स्वतःकडे वळती करुन घ्यावी व

कारखान्याच्या आवश्यकतेनुसार एकमुस्त संपूर्ण कर्ज वितरण राज्य सहकारी बँकेकडून करण्यांत यावे अशी जिल्हा सहकारी बँकेची अपेक्षा आहे व त्यासाठी राज्य सहकारी बँकेला विनंती करावी लागेल.

यावर सभेत चर्चा होऊन चर्चेअंती असे ठरले की, श्रीराम सहकारी साखर कारखान्याकडील दिनांक ३०.९.१९९९ पर्यंतचे थकित कर्ज रुपये २६६.०० लाख राज्य सहकारी बँकेने आपणाकडे घेऊन जिल्हा बँकेची कर्ज वसुली करून देण्याबाबत राज्य सहकारी बँकेला या ठरावाद्वारे विनंती करण्यांत येत आहे. याबाबतची कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार बँकेचे मा० अध्यक्ष यांना देण्यांत येत आहेत.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

यानंतर मा० अध्यक्ष यांचे परवानगीने झालेल्या चर्चेत भाग घेतांना श्री धार्मिक संचालक म्हणाले की, पोल्ट्री फार्ममधील पक्षांचे खाद्यान्ना करिता होणारा खर्च हा प्रमुख खर्चापैकी एक आहे. पक्षांना लागणारे खाद्यान्न हंगामात खरेदी केल्यास स्वस्त दरांत मिळते. हंगाम संपल्यानंतर या खाद्यान्नाचे दरांत बरीच वाढ होते खाद्यान्न पक्षांकरिता विकत घेणे आवश्यक असल्याने हंगाम संपल्यानंतर खाद्यान्न खरेदीवर फार मोठा खर्च होतो. पर्यायी पोल्ट्री फार्ममध्ये पक्षांची संख्या वाढविणे अडचणीचे होऊन मिळणारे उत्पन्नावर मर्यादा येतात. याकरिता बँकेने पोल्ट्री फार्ममधील पक्षांकरिता हंगामात खाद्यान्न खरेदीसाठी संस्थेच्या नांवाने खेळते भांडवलाकरिता प्लेज लोन उपलब्ध करून द्यावे अशी सुचना केली. यावर माननीय अध्यक्ष यांनी प्लेज लोन देता येईल असे सांगितले.

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने उपस्थितांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(signature) (signature)

सरव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमी., नागपूर.